पुण्यनगरी ५.०८.२४

# पोलीस भरतीसाठी आलेल्या तरुणांना संस्थेचा मदतीचा हात

**मीरा रोड** : मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाकडून पोलीस भरती प्रक्रिया सुरू आहे. या भरती प्रक्रियेसाठी भाईंदरमध्ये राज्यभरातून तरुण-तरुणी येत आहेत. या आलेल्या तरुणांना विविध समस्यांचा सामना करावा लागत आहे. या तरुणांच्या समस्या सोडवण्यासाठी मीरा-भाईंदर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चॅरिटेबल ट्रस्ट या संस्थेकडून अल्प दरात भोजन व्यवस्था व निवासापर्यंत सोडण्याची वाहन सुविधा उपलब्ध करून देत या तरुणांना मदतीचा हात दिला आहे.

मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील शिपाई व वाहनचालक पदाच्या रिक्त जागा भरण्यासाठी भरती प्रक्रिया सुरू आहे. या भरतीसाठी भाईंदर पश्चिमेच्या नेताजी सुभाष चंद्र बोस मैदानावर मैदानी चाचणी घेतली जात आहे. या ठिकाणी मैदानी चाचणीला दररोज सुमारे एक हजार हून अधिक तरुण हे राज्यभरातून येतात. या तरुणांना राहण्यासाठी पालिकेकडून मैदानापासून काही अंतरावर व्यवस्था करण्यात आली आहे; परंतु प्रवास व्यवस्था व त्याची माहिती नसल्यामुळे ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी असल्यामुळे ते मैदानाबाहेर रस्त्याच्या कडेलाच रात्री झोपत असल्याचे दिसून येत होते. त्या परिसरात जेवणाची देखील व्यवस्था नव्हती. काही ठिकाणी जेवण, नास्ता मिळतो, ते जास्त पैसे घेत असल्याचे तरुणांनी सांगितले. त्यामुळे भरतीसाठी आलेल्या तरुणांना गैरसोयीचा सामना करावा लागत होता. या तरुणांच्या मदतीला छत्रपती शिवाजी महाराज चॅरिटेबल ट्रस्टने मदतीचा हात पुढे केला आहे. या संस्थेने मैदानाच्या परिसरातच अल्प दरात जेवण, चहा व बाटलीबंद पाण्याची व्यवस्था केली आहे. याचे नाममात्र शुल्क घेतले जात आहे. तसेच रात्री मैदानावर पोहोचलेल्या तरुणांना निवासापर्यंत पोहोचवणे व पहाटे पुन्हा मैदानावर घेऊन येण्याची सुविधादेखील उपलब्ध करून दिली आहे. या सुविधांचा लाभ मोठ्या प्रमाणावर मैदानी चाचणीला आलेले गरीब व गरजू तरुण घेत आहेत. या संदर्भात ट्रस्टचे अध्यक्ष सोमनाथ पवार यांनी हे तरुण येत्या काळात मीरा-भाईंदरकरांच्या सुरक्षेसाठी सेवा देणार आहेत. त्यांना सध्याच्या परिस्थितीत मदतीची गरज असल्याने संस्थेकडून हे कार्य केले जात असल्याचे सांगितले.

# महिला पोलिसांचे प्रमाण केवळ ११.७५ टक्केच

← म.टा-५८.०.१४

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

## 33 टक्क्यांच्या केंद्राच्या सूचनेकडे राज्यांचे दुर्लक्ष



पोलिस दलात महिलांचे प्रतिनिधित्व ३३ टक्क्यांपर्यंत वाढावे याकरिता केंद्र सरकारने राज्यांना वारंवार सूचना केल्या आहेत. परंतु १ जानेवारी २०२२ पर्यंत महिला पोलिसांची प्रत्यक्ष संख्या ११.७५ टक्केच होती. राज्यसभेत बुधवारी ही माहिती देण्यात आली.

'महिला पोलिसांची संख्या एकूण बळाच्या ३३ टक्के असावी, अशी सूचना गृह मंत्रालयाने २२ एप्रिल २०१३, २१ मे २०१४, २१ मे २०१५, २१ जून २०१९, २२ जून २०२१ आणि १३ एप्रिल २०२२ रोजी सर्व राज्य सरकारांना दिली आहे', असे केंद्रीय गृहराज्यमंत्री नित्यानंद राय यांनी सांगितले. पोलिस रिसर्च अँड डेव्हलपमेंट ब्युरोकडून याबाबत गोळा करण्यात आलेल्या आकडेवारीनुसार, देशभरात १ जानेवारी २०२२ रोजी महिला पोलसांनी प्रत्यक्ष संख्या ही एकूण बळाच्या ११.७५ टक्के इतकी आहे, असे त्यांनी एका प्रश्नाचे लेखी उत्तर देताना सांगितले.

लडाखमधील पोलिस दलात महिलांची संख्या सर्वाधिक (२८.३ टक्के) आहे. त्याखालोखाल आंध्र प्रदेशचा (२१.७ टक्के) क्रमांक आहे. चंडीगडमध्ये २१.६ टक्के आणि बिहारमध्ये २१.२ टक्के महिला पोलिस आहेत. महिला पोलिसांची सर्वांत कमी संख्या (३.२ टक्के) जम्मू आणि काश्मिरमध्ये आहे. त्रिपुरामध्ये ५.२९ टक्के आणि मेघालयात ५.९ टक्के महिला पोलिस आहेत. हवालदार आणि उपनिरीक्षकांच्या रिक्त पदांचे रूपांतर करून महिला कॉन्स्टेबल, उपनिरीक्षकांची अतिरिक्त पदे निर्माण करण्याची विनंती राज्यांना करण्यात आल्याचे मंत्री म्हणाले. प्रत्येक पोलिस ठाण्यात किमान तीन महिला उपनिरीक्षक आणि १० महिला पोलिस कॉन्स्टेबल असाव्यात. जेणेकरून एक महिला हेल्प डेस्क २४ तास कार्यरत राहू शकेल, असा उद्देश यामागे असल्याचेही राय म्हणाले.

Scanned with CamScanner

सकाळ ९-२-१९.

# पोलिस कोठडीतील नऊ आरोपींना विषबाधा

## पालिकेच्या नालासोपाऱ्यातील रुग्णालयात उपचार सुरू; सर्वांची प्रकृती स्थिर

नालासोपारा, ता. ८ (बातमीदार) : नालासोपारा पोलिस कोठडीत असलेल्या नऊ आरोपींना दुपारच्या जेवणातून विषबाधा झाली असल्याची धक्कादायक घटना उघड झाली आहे. विषबाधित आरोपींना वसई विरार महापालिकेच्या नालासोपारा पश्चिमेकडील रुग्णालयात दाखल केले असून, त्यांची प्रकृती स्थिर आहे. मात्र ही विषबाधा आरोपींना देण्यात येणाऱ्या सरकारी जेवणातून झाल्याने खळबळ माजली आहे.

मंगळवारी (ता. ७) दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास नालासोपारा पोलिस ठाण्याच्या कोठडीत असणाऱ्या आरोपींना सरकारी जेवण देण्यात आले होते. जेवणानंतर नऊ आरोपींना अचानक पोटात मळमळ आणि उलटीचा त्रास होऊ लागला. ही घटना वरिष्ठ पोलिस निरीक्षक विलास सुपे यांनी तत्काळ वरिष्ठांच्या निदर्शनास आणून दिली. सर्व आरोपींना वसई विरार महापालिकेच्या नजीकच्या रुग्णालयात दाखल करून तातडीने उपचार सुरू करण्यात आले आहेत. सर्व आरोपींना पोलिसांच्या देखरेखीसाठी ठेवण्यात आल्याची माहिती देण्यात आली. विषबाधा झालेल्यांमध्ये पाच जण खुनातील संशयित आरोपी; तर चार आरोपी हे एटीएम कार्डची अदलाबदली करून नागरिकांची फसवणूक करणारे आहेत. विषबाधेच्या कारणाचा शोध घेण्यासाठी नमुने फॉरेन्सिन लॅबला पाठवण्यात आल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

आरोपींना सरकारी जेवण देण्यात आले होते; पण अचानक ९ आरोपींना त्रास झाल्याने त्यांना दवाखान्यात दाखल केले. जेवणातून विषबाधा झाली, त्याचे नमुने फॉरेन्सिक लॅबला पाठवले आहेत. त्याच्या अहवालानंतर विषबाधेचे कारण समजेल.

- विलास सुपे, वरिष्ठ निरीक्षक, नालासोपारा पोलिस ठाणे

नऊपैकी पाच जणांना उलटीचा त्रास जास्त होता. त्यांना नाकावाटे नळी टाकून पोटातील विष बाहेर काढण्यात आले. २४ तास उपाशीपोटी ठेवून आज पाणी आणि थोडे जेवण दिले. सर्वांची प्रकृती स्थिर आहे.

- गौरव वाघ, वैद्यकीय अधिकारी, वसई विरार महापालिका रुग्णालय, सोपारा

सकाळ ९-२-१९.

# उद्यापासून महिला उमेदवारांची चाचणी

भाईंदर, ता. ८ (बातमीदार) : मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालयासाठी सुरू असलेल्या भरती प्रक्रियेतील पुरुष उमेदवारांच्या शारीरिक चाचण्या येत्या दोन दिवसांत पूर्ण होणार आहेत. त्यानंतर १० फेब्रुवारीपासून महिला उमेदवारांच्या शारीरिक चाचणी प्रक्रियेला सुरुवात होणार आहे.

पोलिस आयुक्तालयातील ९९६ जागांसाठी भाईंदर पश्चिम येथील नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानावर भरती प्रक्रिया सुरू आहे. यातील पुरुष उमेदवारांची शारीरिक चाचणी प्रक्रिया ९ फेब्रुवारीला संपणार आहेत; तर १० फेब्रुवारीपासून महिला उमेदवारांची चाचणी प्रक्रिया सुरू होणार आहे. महिला पोलिसपदांसाठी २९७ व चालक या पदासाठी दोन जागा आहेत.

पुरुष उमेदवार भरतीच्या वेळी सुरुवातीच्या काळात उमेदवारांची राहण्याची कोणतीही सुविधा करण्यात आली नव्हती. पण आता १० फेब्रुवारीला सुरू होणाऱ्या महिला भरतीसाठी आधीच काळजी घेण्यात आली आहे. येणाऱ्या महिला उमेदवारांना महापालिकेने भाईंदर पश्चिम येथील नगरभवन सभागृह, मिरा रोड येथील प्रमोद महाजन, आप्पासाहेब धर्माधिकारी सभागृह व मीनाताई ठाकरे सभागृह विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आले आहे.

### सवलतीत रिक्षासेवा

उमेदवारांना नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानापर्यंत जाण्यासाठी सवलतीच्या दरात रिक्षादेखील तैनात करण्यात येणार आहेत.

Scanned with CamScanner

लोकसत्ता ५-पा-४.

# कामगिरी उंचावली

## गुन्हे उकल करण्याचे प्रमाण नऊ टक्क्यांनी वाढले

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**२०२२ मध्ये गुन्ह्यांचे उकल करण्याचे प्रमाण**

| गुन्हे | दाखल | उघड | उकल प्रमाण |
|---|---|---|---|
| बलात्कार | ३५७ | ३५६ | ९९% |
| विनयभंग | ५४६ | ५२४ | ९६ % |
| हत्या | ३८ | ३८ | १०० % |
| चोरी | २०१ | १४४ | ७२% |
| सोनसाखळी चोरी | ४१ | २३ | ५६% |
| दुखापत | १०५४ | १०३८ | ९८% |

**वसई :** मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील गुन्हे उघडकीस येण्याचे प्रमाण वाढले आहे. २०२१ च्या तुलनेत २०२२ मध्ये गुन्ह्यांचे उकल करण्याचे प्रमाण नऊ टक्क्यांनी वाढले आहे. २०२२ मध्ये एकूण दाखल गुन्ह्यांची उकल करण्याचे प्रमाण हे ८५ टक्के एवढे आहे.

पालघर आणि ठाणे ग्रामीणचे विभाजन करून २ ऑक्टोबर २०२२ मध्ये मीरा-भाईंदर वसई विरार-पोलीस आयुक्तालयाची स्थापना झाली. पोलीस आयुक्तालयात १७ पोलीस ठाणे असून, तीन परिमंडळे आहेत. शहरी आणि ग्रामीण आणि सागरी, अशी पोलीस आयुक्तालयाची रचना आहे. दाखल झालेल्या गुन्ह्यांची उकल करण्यावर पोलिसांनी पहिल्यापासून भर दिला होता. सध्या २०२१ मध्ये गुन्ह्यांचे उकल करण्याचे प्रमाण ७६ टक्के होते. २०२२ मध्ये हे प्रमाण नऊ टक्क्यांनी वाढले असून ते ८५ टक्के एवढे झाले आहे. गंभीर गुन्ह्यांची सर्वाधिक उकल करण्यात पोलिसांना यश आले आहे.

२०२२ या वर्षात ३८ हत्या झाल्या. त्या सर्व ३८ हत्यांची उकल करण्यात पोलिसांना यश आले आहे. २०२१ मध्ये हत्यांची उकल करण्याचे प्रमाण ९० टक्के एवढे होते. तर, बलात्कार (९९ टक्के), विनयभंग (९६ टक्के), दुखापत (९८ टक्के), चोरी (७२ टक्के) एवढे प्रमाण आहे. यंदा सोनसाखळी चोरीचे गुन्हे निम्म्याने कमी झाले असले तरी त्याचे उकल करण्याचे प्रमाण मात्र केवळ ५६ टक्के आहे. गुन्ह्यांची उकल करण्यासाठी स्थानिक पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेबरोबर तीन गुन्हे शाखेचे विभाग कार्यरत आहे. गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी पोलिसांना प्रशिक्षण आणि तांत्रिक मदत पुरवली जात असते. या शिवाय सर्वोत्कृष्ट उकल करणाऱ्या पोलिसांना प्रोत्साहन देण्यासाठी दर महिन्याला 'बेस्ट डिटेक्शन'चे पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. गुन्ह्यांची उकल करण्याबरोबर गुन्ह्यांवर नियंत्रण आणण्याचा आमचा प्रयत्न असल्याचे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले.

लोकसत्ता ५-पा-१०

# वाहतूक पोलिसांची जप्तीची कारवाई थंडावली

## वाहने ठेवण्यासाठी जागेचा अभाव

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई :** वसई-विरार शहरात वाहतूक पोलिसांनी बेकायदा रिक्षांवर व वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर जप्तीची कारवाई सुरू केली होती. मात्र, जप्त केलेल्या वाहनांना ठेवण्यासाठी पुरेशी जागाच उपलब्ध होत नसल्याने कारवाईची मोहीम थंडावली आहे.

वसई-विरारमध्ये रिक्षांची संख्या



बेसुमार वाढली आहे. बेकायदा व नियमबाह्य पद्धतीने रिक्षा चालविल्या जात आहेत. अशा रिक्षांना बंदी घालण्यासाठी वाहतूक विभागाने विशेष तपासणी मोहीम हाती घेतली होती. त्यात बेकायदा रिक्षा जप्त केल्या जात होत्या. या शिवाय वाहतुकीला अडथळा निर्माण करणारी, 'नो-पार्किंग'मध्ये उभी असलेली, तसेच वाहतुकीच्या अन्य नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणीही वाहने जप्त करण्यात येत होती. परंतु, वाहने ठेवण्यासाठी पुरेशी जागाच उपलब्ध होत नसल्याने प्रश्न निर्माण झाला आहे. दरम्यान शहरात बेकायदा रिक्षा चालविल्या जात असल्याच्या तक्रारी येत आहेत. परंतु, कारवाईत वाहने जप्त केल्यास ठेवण्यास जागेच्या अडचणी येतात, असे वरिष्ठ पोलीस निरीक्षक वाहतूक विभाग परिमंडळ २ चे सागर इंगोले यांनी सांगितले.

### वाहनांचे साहित्य चोरीला जाण्याचे प्रकार

एव्हरशाईन जवळील भागात कारवाई, गुन्ह्यातील, अपघातग्रस्त अशी वाहने ठेवण्यासाठी पालिकेने जागा उपलब्ध करून दिली आहे. जागेला संरक्षण कठडा नसल्याने रात्रीच्या सुमारास गर्दुल्ले येऊन वाहनांतील विविध प्रकारचे साहित्य लंपास करीत आहेत. या जागेच्या सभोवताली पालिकेने भिंत बांधून द्यावी याबाबत पालिकेशी पत्रव्यवहार करण्यात आल्याचे वाहतूक विभागाकडून सांगण्यात आले आहे.

Scanned with CamScanner

म. टा. पु. पा. १.

# कोंडीमुक्तीसाठी आराखडा

## वाहतूक सुधारणांची टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी; विरार पूर्वेकडून सुरुवात

**म. टा. वृत्तसेवा, वसई**

वसई-विरार शहरातील अरुंद रस्ते, रस्त्यावरील वाढलेली वाहनांची संख्या, बेवारस वाहने आणि फेरीवाल्यांचे अतिक्रमण या सर्वांचा परिणाम शहरातील वाहतुकीवर होऊ लागला आहे. परिणामी, वाहतूककोंडीची समस्या अधिकच जटील होत चालली आहे. यावर तोडगा काढण्यासाठी पालिकेने पुढाकार घेतला असून यासाठी नुकतीच एक सर्वसमावेशक बैठक पार पडली. शहरातील वाहतूककोंडी टप्प्याटप्प्याने सोडविण्याचा निर्णय पालिकेने घेतला असून त्याची सुरुवात विरार पूर्वेकडील भागाकडून करण्यात आली. या बैठकीत विरारमधील वाहतूककोंडी सोडविण्याबाबतचे मुद्दे मांडण्यात आले असून याआधारे पालिका 'वाहतूक आराखडा' तयार करणार आहे. तसेच, त्यानुसार



उपाययोजना करण्यासही सुरुवात केल्याचे पालिकेने सांगितले.

विरार शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढू लागली आहे. वाहनांची गर्दीही प्रचंड प्रमाणात वाढू लागली असली तरी वाहने उभी करण्यासाठी पुरेशा प्रमाणात विरारमध्ये जागा नाही. त्यामुळे अनेकजण वाहने रस्त्याच्या मध्येच उभी करतात. तर, दुसरीकडे अनेक गॅरेजचालक व फेरीवाल्यांनी रस्त्यावर अतिक्रमण करून रस्त्याच्या दुतर्फा दुकाने थाटली आहेत. यामुळे रस्त्याची रुंदी कमी होऊन रस्ते अपुरे पडू लागले आहेत. यामुळे वाहतूककोंडीची समस्या निर्माण होऊ लागली आहे. त्यामुळे नागरिक हैराण झाले असून यावर तोडगा काढण्यासाठी पालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांच्या अध्यक्षतेखाली एका बैठकीचे आयोजन केले होते. यावेळी विविध पक्षांचे प्रतिनिधी, पोलिस प्रशासन, वाहतूक पोलिस आणि पालिका अधिकारी सहभागी झाले होते.

यावेळी विरार शहरातील वाहतुकीच्या विविध समस्या मांडून त्यावर उपाययोजनाही सुचविण्यात आल्या. त्याची अंमलबजावणी करण्यास सुरुवात करणार असल्याचे पालिकेचे आयुक्त अनिलकुमार पवार यांनी सांगितले. यासाठी वाहतूक आराखडा तयार करून, त्यानुसार कार्यवाही केली जाणार असल्याचे पालिकेचे कार्यकारी अभियंता राजेंद्र लाड यांनी सांगितले.

**या आहेत उपाययोजना...**

- विरार पूर्वेकडील वाहतूक नियंत्रित करण्यासाठी एकेरी मार्ग नियोजन करणे
- काही रिक्षाथांबे पर्यायी जागी हलविणे
- विरार पूर्व भागातील स्थानक परिसरात १ किमी परिक्षेत्रात अवजड वाहनांना प्रवेश बंद करणे
- विरार पूर्व स्थानक परिसरात रस्त्याच्या कडेला दुचाकी व चारचाकी वाहनांना पार्किंग करण्यास प्रतिबंध करणे
- विरार पूर्वेकडील वापराविना पडलेल्या स्कायवॉकचा वापर करण्यासाठी योग्य ती स्वच्छता करणे आणि सुरक्षा देणे
- मंजूर विकास आराखड्यातील रस्ता विकसित करणे

**“ पहिल्या टप्प्यात विरार पूर्वेकडील वाहतूककोंडी सोडविण्यास सुरुवात केली आहे. वाहतूक नियंत्रित करण्यासाठी टप्पा-टप्प्याने उपाययोजना आखण्याबाबत निर्देश दिले आहेत. वाहतूक आराखडा तयार करून उपाययोजना केल्या जातील.**

- अनिलकुमार पवार, आयुक्त, वसई-विरार महापालिका

Scanned with CamScanner

कहीं रिल्स का शौक ना पड़ जाए जान पर भारी
...पेज-3

MHT
मुंबई
# हिंदमाता टाइम्स
राष्ट्रीय हिन्दी दैनिक
मुंबई, गुरुवार 9 फरवरी 2023
RNI No. MAHHIN/2006/20347 | E-mail: mumbaihindmatatimesnews@gmail.com | Website : www.mumbaihindmatatimes.com

जब बेल बॉटम पहनना बिग बी को पड़ा था भारी
...पेज-6

| आज का पंचांग | सूर्योदय / सूर्यास्त | आज का मौसम | तापमान | शेयर बाजार | सर्राफा बाजार |
|---|---|---|---|---|---|
| | 7.10am 6.36pm | | अधिकतम 32°C न्यूनतम 22°C | NSE BSE | |

# कहीं रिल्स का शौक ना पड़ जाए जान पर भारी

**150 हादसों में गई 59 लोगों की जान**

संवाददाता MHT
राकेश सिंह

नालासोपारा। आज की युवा पीढ़ी सोशल मीडिया पर मशहूर होने के लिए जान की भी परवाह नहीं करती है। छोटी-छोटी रील बनाकर सोशल मीडिया पर अपलोड करने के लिए किसी भी हद तक चले जाते हैं। आज की युवा पीढ़ी अपने वीडियो पर अधिक से अधिक लाइक पाने के लिए कुछ भी करने को तैयार है, लेकिन कभी-कभी उनकी यह चाह जान भी ले लेती है। हाल के दिनों में ड्राइविंग स्टंट, नशे में गाड़ी चलाना, नियम तोड़ना, वीडियो रीलों को सोशल मीडिया पर साझा करने के लिए तेजी से दौड़ना देखा जाना आम बात है।

### एक साल में 150 हादसे

मुंबई-अहमदाबाद हाईवे पर 12 जानलेवा स्पॉट हैं और पिछले एक साल में 150 हादसों में 59 लोगों की जान जा चुकी है जबकि 54 लोग गंभीर रूप से घायल हैं।




### माता-पिता अपने बच्चों पर ध्यान दें

आज के दौर में मोबाइल हर किसे के जीवन का अभिन्न हिस्सा बन गया है। बच्चे लगातार मोबाइल गेम खेलने या रील बनाने में व्यस्त रहते हैं, जबकि इसका ज्यादा इस्तेमाल बच्चों के लिए काफी खतरनाक होता जा रहा है। इसलिए, माता-पिता को यह ध्यान देना चाहिए कि उनका बच्चा मोबाइल में कब और क्या कर रहा है। ज्यादातर लोग खाली समय में अपना वक्त फोन पर बिताते हैं। खाली समय में मोबाइल फोन का उपयोग करने के बजाय किताबें पढ़कर, सैर पर जाकर, दोस्तों से मिलकर स्क्रीन टाइम कम करें।

आजकल बच्चे मोबाइन का ज्यादा इस्तेमाल करने लगे हैं और इसी के चलते वे खेल, व्यायाम, लोगों से मिलना, बात करना और जीवन में उपयोगी कौशल सीखने की उपेक्षा करते हैं। नतीजतन, बच्चे आसपास के वातावरण से अलग हो जाते हैं और उनका व्यवहार स्क्रीन पर दिखाई देने वाली आभासी दुनिया जैसा दिखने लगता है। ये बच्चों के विकास को प्रभावित करता है।

**डॉक्टर अक्षय कोठरी (कोठरी क्लिनिक)**



Scanned with CamScanner

लोकमत

# स्वस्तात घर देण्याच्या नावाखाली फसवणूक

## युनिट-३ ने केली मुख्य आरोपीला अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : स्वस्त दरात फ्लॅट विकण्याच्या बहाण्याने सर्वसामान्यांची फसवणूक करणाऱ्या मुख्य आरोपीला जेरबंद करण्यात गुन्हे शाखेच्या युनिट-३ च्या पथकाला यश आले आहे. या अटकेनंतर पाच गुन्हे उघडकीस आल्याची माहिती जनसंपर्क अधिकाऱ्यांनी मंगळवारी दिली आहे.

१३ मार्च ते जून २०२१ या कालावधीत रामसिंग देवरा, शुभम मिश्रा, सूरज दुबे, गौतम चौधरी आणि रूम मालक पुलक दास यांनी मिळून तक्रारदार हरेल पॅट्रिक साळवीन (६९) यांच्याकडून फ्लॅट मिळवून देण्याच्या नावाखाली १७ लाख रुपये घेतले. बराच वेळ होऊनही तक्रारदाराला हक्काचे घर न मिळाल्याने त्यांनी या सर्वांवर गुन्हा दाखल केला.

वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गुन्हे शाखा-३ च्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना फसवणुकीच्या गुन्ह्यांची उकल करण्याच्या सूचना दिल्या होत्या. नोंदवलेल्या समांतर गुन्ह्याचे विश्लेषण करताना मिळालेली गोपनीय माहितीच्या आधारे गुन्हे शाखेने या गुन्ह्यातील मुख्य आरोपी रामसिंग जालमसिंग देवरा (२८) याला २ फेब्रुवारीला अटक केली. आरोपी सध्या नालासोपारा पोलिसांच्या कोठडीत आहे. स्वस्त दरात घरे खरेदी करू इच्छिणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांची हेरगिरी करण्याचा कट त्याने त्याच्या इतर साथीदारांसह रचल्याचे प्राथमिक तपासात उघड झाले आहे. अशा अनेकांची या आरोपीने ५० लाख रुपयांची फसवणूक केली होती. पोलिस उपायुक्त गुन्हे अविनाश अंबुरे, सहायक पोलिस आयुक्त अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक प्रमोद बडाख यांच्या पथकाने ही कारवाई केली.

### पोलिसांना संपर्क साधा

गेल्या काही महिन्यांपासून मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयाच्या वसई-विरार परिसरात स्वस्त दरात फ्लॅट विक्रीसाठी उपलब्ध करून देण्याची जाहिरात करणारे रॅकेट सक्रिय आहे. त्याआधारे फसवणुकीचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. फसवणूक झालेल्यांनी पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.



Scanned with CamScanner